*No.TS/4/2020-Title (RNI)*

**Office of Registrar of Newspapers for India**

(M/o Information & Broadcasting)

9th Floor, Soochna Bhawan, CGO Complex,

Lodhi Road, New Delhi-110003.

Dated 08/09/2020

# NOTICE TO PUBLISHERS

**Subject: Title Verification Guidelines reg.**

The Title verification guidelines as amended on 08.09.2020 by the competent authority is attached. Following may kindly be noted:

(i) The amended guidelines will be effective from today (i.e. 08.09.2020), except for (ii) below

(ii) The *Clause 16(a)* of the guidelines shall be effective from 01st January 2021 or, if notified otherwise

(iii) The guidelines are now made available in Urdu, Gujarati, Marathi, Bengali, Odia, Assamese, Kannada, Telugu, Malayalam and Tamil languages, in addition to Hindi and English.

(Joyce Philip)

Asst. Press Registrar

क्र. *TS/4/2020-Title(RNI)*

भारत सरकार

रजिस्ट्रार ऑफ न्यूजपेपर्स - भारत, यांचे कार्यालय

(माहिती आणि प्रसारण मंत्रालय)

9 वा मजला, सूचना भवन, सीजीओ संकुल,

लोधी रोड, नवी दिल्ली - 110003

******

**दिनांक: 08th September, 2020**

## वर्तमानपत्र शीर्षक सत्यापनासाठी मार्गदर्शक सूचनांचा

1. मुद्रणालय आणि पुस्तके अधिनियम 1867 अन्वये " सार्वजनिक बातम्या अथवा सार्वजनिक बातम्यांवरील टिप्पणी अशा प्रकारचे नियतकालिक स्वरूपाचे मुद्रित काम" असे परिभाषित करीत, वर्तमानपत्रांच्या नोंदणीची तरतूद करण्यात आली आहे.

2. वर्तमानपत्र प्रकाशित करू इच्छिणाऱ्या कोणत्याही व्यक्तीला वर्तमानपत्राच्या प्रस्तावित शीर्षकासह (शीर्षकांसह) विनिर्दीष्ट प्राधिकरणाकडे शपथपत्र सादर करावे लागेल. प्रस्तावित शीर्षकाबाबत प्रेस रजिस्ट्रारकडून खालील बाबींची खातरजमा केल्यानंतर विनिर्दिष्ट प्राधिकरण संबंधित शपथपत्र प्रमाणित करेल:

a. प्रस्तावित शीर्षक हे राज्यातील इतर कोणत्याही भाषेतील शीर्षकासमान अथवा सारखे नाही किंवा

b. भारतभरातील याच भाषेतील कोणत्याही विद्यमान शीर्षकासमान नाही.

3. शीर्षक सत्यापनाठी अर्ज करण्यापूर्वी अर्जदाराने आरएनआयच्या संकेतस्थळावर '**Verified Titles/Title Search'**या दुव्यावर उपलब्ध सत्यापित शीर्षकांची समग्र यादी तपासून पाहावी आणि प्रस्तावित शीर्षक हे आरएनआयतर्फे आधीपासूनच सत्यापित करण्यात आलेल्या शीर्षकासमान नसल्याची खातरजमा करून घ्यावी. आरएनआयच्या संकेतस्थळावर प्रदर्शित शीर्षके आरएनआयद्वारे सत्यापित करण्यात आलेली असली तरी**सत्यापित शीर्षकांच्या यादीत नसलेली शीर्षके उपलब्ध असतीलच, असे नाही**.

शीर्षक मंजूर अथवा नामंजूर करण्याचा अंतिम अधिकार प्रेस रजिस्ट्रार यांनाच राहील.

(4) वर्तमानपत्र/नियतकालिकाच्या शीर्षक सत्यापनासाठी केवळ ऑनलाईन पद्धतीनेच अर्ज करता येईल. http//www.rni.nic.in. या आरएनआयच्या संकेतस्थळावर हा आवेदन/अर्ज नमूना (संलग्न स्वरूपात) उपलब्ध आहे. या अर्जाची छापील प्रत - प्रिंट विनिर्दिष्ट प्राधिकरणामार्फत (जिल्हा दंडाधिकारी/संबंधित जिल्ह्याचे कार्यकारी दंडाधिकारी यांच्यामार्फत ) आरएनआयकडे पाठवली जावी.

(5) अर्ज अग्रेषित करणाऱ्या विनिर्दिष्ट प्राधिकरणाचा शिक्का आणि स्वाक्षरी, शीर्षक अर्जाच्या प्रत्येक पृष्ठावर स्पष्ट आणि सुवाच्य असावी.

(6) शीर्षक सत्यापनासाठी जिल्हा दंडाधिकारी/ विनिर्दिष्ट प्राधिकरण यांच्यामार्फत अग्रेषित शीर्षक अर्जाच्या मूळ प्रतींवरच आरएनआयतर्फे प्रक्रिया केली जाईल.**छायांकित प्रती विचारात घेतल्या जाणार नाहीत.**शीर्षक अर्जावर खाडाखोड, पांढऱ्या द्रवाचा वापर, मजकूर रद्द करणे, पुनर्लेखन करण्यास परवानगी नाही.

(7) एखाद्या अर्जात एकापेक्षा जास्त भाषा नमूद केल्या असल्यास तो अर्ज द्वीभाषी /बहुभाषी वर्तमानपत्रासाठी आहे, असे मानले जाईल आणि त्यानुसार त्याचे सत्यापन केले जाईल.

(8) वर्तमानपत्र किंवा प्रकाशन हे एका भाषेतील असेल, ते द्विभाषी किंवा बहुभाषी असू शकेल. जर प्रकाशन द्वीभाषी किंवा बहुभाषी असले तर त्यातील सर्व बातम्या/लेख, ज्या भाषांमध्ये शीर्षकाचे सत्यापन झाले आहे, त्या सर्व भाषांमध्ये असले पाहिजेत. वेगळ्या भाषेत स्वतंत्र प्रकाशन आणावयाचे असल्यास अशा प्रत्येक प्रकाशनासाठी स्वतंत्र अर्ज सादर करावा लागेल.

(9) **त्याच भाषेत त्याच राज्यातून मात्र वेगळ्या जिल्ह्यातून विद्यमान प्रकाशनाची नवी आवृत्ती आणायची असली तर त्यासाठी शीर्षकाच्या पूर्व सत्यापनाची आवश्यकता नाही.**प्रकाशकाला थेट शपथपत्र सादर करता येईल आणि त्यानंतर नोंदणी क्रमांक आणि प्रमाणपत्र जारी करण्यासाठी आरएनआयकडे आवश्यक कागदपत्रे सादर करावी लागतील. मात्र प्रस्तावित नवी आवृत्ती अन्य राज्य अथवा अन्य भाषेतील (त्यात किंवा अन्य राज्यातील) असली तर शीर्षकाचे पूर्व सत्यापन आवश्यक राहील.

(10) एखाद्या अर्जदाराकडे एखाद्या विशिष्ट भाषेतील, राज्यातील अथवा नियतकालिकाच्या शीर्षकाचे स्वामित्व असेल, तर त्याच्याकडे त्या शीर्षकाच्या इतर भाषांतील, राज्यांतील अथवा नियतकालिकाच्या शीर्षकावर स्वाभाविक स्वामित्वाचा दावा असणार नाही.

(11) इतर राज्य, भाषा अथवा नियतकालिकाच्या पूर्व-स्वामित्वाच्या शीर्षकाचे सत्यापन, हे मार्गदर्शक तत्वांना अनुसरून उपलब्धतेच्या अधिन राहील.

(12) असे अर्जदार, ज्यांनी आरएनआय नोंदीमध्ये आधीच आपल्या नावे प्रकाशने नोंदविली आहेत त्यांनी नवीन शीर्षकासाठी अर्ज करण्यापूर्वी, आपल्या**नोंदणीकृत प्रकाशनासंदर्भातील अलिकडचे वार्षिक विवरणपत्र योग्य प्रकारे भरून आरएनआयच्या कार्यालयात दाखल केल्याची खातरजमा**करुन घ्यावी.

(13) शीर्षक सत्यापनासाठीचा अर्ज कोणत्याही प्रकारे अपूर्ण असल्यास तो फेटाळला जाण्यास पात्र राहील.

(14) अर्जावर प्रक्रिया करताना शीर्षक सत्यापनासाठी प्रेस रजिस्ट्रारद्वारे अवलंबिण्यात येणारे सविस्तर निकष पुढीलप्रमाणे:

a. एखाद्या राज्यातील कोणत्याही भाषेतील समान अथवा सारख्या शीर्षकाचे अथवा देशभरातील त्याच भाषेतील समान अथवा सारख्या शीर्षकाचे सत्यापन केले जाणार नाही.

b. परदेशी शीर्षक मालकासह केलेला वैध परवाना करार सादर केल्याशिवाय एखाद्या परदेशी वर्तमानपत्र/ मासिकासमान अथवा सारख्या शीर्षकाचे सत्यापन केले जाणार नाही.

c. अर्जदाराने, त्याला पूर्वी बहाल करण्यात आलेल्या शीर्षकाची (शीर्षकांची) नोंदणी केल्यानंतरच त्याला नवीन शीर्षकासाठी (शीर्षकांसाठी) अर्ज करता येईल.

d. अर्जदाराला एका वेळी तीन पेक्षा जास्त शीर्षकांसाठी अर्ज करता येणार नाही. एका अर्जदाराकडून तीन पेक्षा जास्त अर्ज प्राप्त झाल्यास, केवळ तीनच अर्ज विचारात घेतले जातील, इतर नाकारले जातील.

e. खालील बाबी वगळता, प्रथम येणाऱ्यास प्राधान्य या तत्वावर अर्जांचे सत्यापन केले जाईल.:

i. परदेशी शीर्षक असल्यास, अर्जदाराने माहिती आणि प्रसारण मंत्रालयाचे ना-हरकत प्रमाणपत्र सादर केल्यास.

ii. न्यायालयाचे किंवा कोणत्याही वैधानिक प्राधिकरणाचे निर्देश असल्यास, आणि अशा दिशानिर्देश / आदेशाविरूद्ध अपील न करण्याचा निर्णय घेण्यात आला असल्यास ते बंधनकारक असतील.

iii. इतर कोणत्याही प्रकरणी जनहितार्थ असल्यास प्रेस रजिस्ट्रार यांच्या मान्यतेने.

f. अर्जदाराने अर्ज सादर करताना कोणत्याही शब्दलेखन त्रुटीमुळे शीर्षक फेटाळले गेल्यास आरएनआय जबाबदार असणार नाही.

g. मुद्रणालय आणि पुस्तके अधिनियम 1867 च्या कलम 1 नुसार आरएनआय केवळ पुस्तके आणि नियतकालिकांचीच नोंदणी करते. खालील प्रवर्गातील अर्जदारांनी शीर्षक सत्यापनासाठी केलेले अर्ज विचारात घेतले जाणार नाहीत :

i. वृत्त संस्था
ii. लेख संस्था
iii. वृत्त संकेतस्थळे
iv. वृत्त वाहिन्या
v. डॉट कॉम, डॉट इन, ई, ब्लॉग, पोर्टल, फेसबुक, ट्वीटर, ऑर्कुट, लिंक्ड इन, यूट्यूब, याहू, गुगल, विकीपीडीया, विकीलिक्स अशा शब्दांचा वापर करणाऱ्या शीर्षक पर्यायांसह प्रकाशनांच्या इलेक्ट्रॉनिक आवृत्ती.

(15) प्रस्तावित वर्तमानपत्रांसाठी खालील शीर्षक प्रवर्ग विचारात घेतले जाणार नाहीत:

i. शासकीय विभाग, शासकीय संघटना, परदेशी सरकारे, संयुक्त राष्ट्रे, जागतिक आरोग्य संघटना, आंतरराष्ट्रीय श्रम संघटना इ. आंतरराष्ट्रीय संघटनांची नावे असलेली शीर्षके, जी अशा संघटनांशी संबंधित असल्याची दिशाभूल सुचवतात.
ii. केंद्र/राज्य सरकारे अथवा त्यांच्या संघटना अथवा स्थानिक स्वराज्य संस्था यांच्या सार्वजनिक कल्याणकारी योजनांशी संबंधित असल्याचे सूचित करणारी शीर्षके.
iii. जाहिराती, निविदा, स्थावर मालमत्ता, दिनदर्शिका, पंचांग, वधू-वर सूचक जाहिराती, यलो पेजेस (साधारणपणे श्वेत, गुलाबी इ. उपसर्ग असणाऱ्या) मार्गदर्शिका, डायरी, सारांश, तथ्य सारीणी (फॅक्ट शीट्स), बुलेटिन (बातमीपत्र), पत्रक, माहिती पत्रक, निर्देशिका अशा शब्दांचा समावेश असणारी शीर्षके, ज्या प्रकारच्या प्रकाशनांमध्ये बातमी/मते/लेख इ. चा समावेश नसतो.
iv. संक्षेप किंवा आद्याक्षर संज्ञा असणारी शीर्षके उदा.: B2B, A2Z इ.
v. चित्रालेख, व्हिडीओग्राम्स, हॉलमार्क, लोगो, मोनोग्राम, संक्षेप, फोनोग्राम, इमोजी इ. चिन्हे आणि चिन्हे असलेल्या कोणत्याही शीर्षकाचे शीर्षक म्हणून वापर करण्यासाठी सत्यापन करता येणार नाही.
vi. चित्रे अथवा चिन्हे अशा शब्द-संख्या विरहित वर्णांचा समावेश असणारी असणारी शीर्षके.
vii. प्रथमदर्शनी हास्यास्पद किंवा निरर्थक शीर्षकांचे सत्यापन केले जाणार नाही. शीर्षकामध्ये संख्या आणि +, * अशा कोणत्याही स्वरूपाच्या गणिती चिन्हाचा वापर केला जाऊ नये. साप्ताहिक, वीकली, संध्या इव्हनिंग, डेली, दैनिक, न्यूज अशा शब्दांच्या निरर्थक संयोगाच्या शीर्षकांचे सत्यापन केले जाणार नाही.
viii. धार्मिक अर्थ असणारी शीर्षके, तसेच लोकांच्या भावनांच्या दृष्टीने अश्लील आणि आक्षेपार्ह अशा शीर्षकांचे सत्यापन केले जाणार नाही.
ix. नकारात्मक अर्थ असणाऱ्या किंवा गुन्हा आणि भ्रष्टाचार अशा शब्दांसह दुरूपयोग केला जाऊ शकेल, अशा शीर्षकांचे सत्यापन केले जाणार नाही.

x. केवळ संघटना/संस्था/कंपन्या/विश्वस्त निधी यांनाच शीर्षकामध्ये रोजगार/करीयर/जॉब/नोकरी अशा शब्दांचा वापर करता येईल. व्यक्तिगत अर्जदारांच्या अशा प्रकारच्या शीर्षकांचे सत्यापन केले जाणार नाही.

xi. “बोधचिन्ह व नावे (अनुचित वापरास प्रतिबंध) अधिनियम 1950” चे उल्लंघन करणारी शीर्षके.

xii. कोणत्याही**राष्ट्रीय प्रतीक, राष्ट्रीय बोधवाक्याशी**साधर्म्य असणाऱ्या किंवा केंद्र सरकार / राज्य सरकार / स्थानिक स्वराज्य संस्था यांच्याशी संबंध असल्याबाबत दिशाभूल करणाऱ्या शीर्षकाचे सत्यापन केले जाणार नाही.

xiii. संबंधित विभाग वगळता देशातील ‘पोलिस’, ‘ब्युरो’, ‘अन्वेषण विभाग’, ‘दक्षता’, ‘सीआयडी’, ‘सीबीआय’ इ. अशा नियामक / अंमलबजावणी करणाऱ्या संस्थांची नावे वापरणारी शीर्षके.

xiv. देशाचे विद्यमान / माजी राष्ट्रपती आणि पंतप्रधान, राज्यांचे विद्यमान राज्यपाल आणि मुख्यमंत्री तसेच विद्यमान सरन्यायाधीश, नियंत्रक आणि महालेखा परीक्षक आणि मुख्य निवडणूक आयुक्त यांच्या नावे असणारी शीर्षके, ज्या नावे या प्रकाशनाची नोंदणी केली जात आहे.

xv. राष्ट्रीय नेते किंवा प्रमुख राष्ट्रीय नेते, सरकारप्रमुख, केंद्र आणि राज्य सरकारचे अधिकारी यांच्या नावे किंवा नावांशी साधर्म्य असणाऱ्या शीर्षकांचे सत्यापन केले जाणार नाही. मात्र, **संबंधित संघटनेने**अर्ज केल्यास राष्ट्रीय आणि राज्य स्तरावरील मान्यताप्राप्त राजकीय पक्षांची नावे विचारात घेतली जातील.

xvi. विद्यमान नोंदणीकृत वर्तमानपत्रांच्या शीर्षकांचा संयोग असलेले शीर्षक तसेचदोन किंवा त्याहून जास्त विद्यमान शीर्षकांचा संयोग असलेले शीर्षक किंवा विद्यमान शीर्षकाचा एखादा भाग, ज्यामुळे नवीन शीर्षक पूर्णपणे भिन्न ठरत नाही, अशा शीर्षकांचे सत्यापन केले जाणार नाही. अर्थामध्ये लक्षणीय फरक नसल्यास, विद्यमान शीर्षकातील दोन शब्दांच्या मध्ये एखादा शब्द समाविष्ट करणे सारखेच मानले जाईल.

xvii. भाषा, प्रकाशनाचे स्थान आणि वारंवारिता विचारात न घेता समान किंवा भिन्न क्रमाने विद्यमान शीर्षकातील समान शब्द असलेली शीर्षके.

xviii. विद्यमान शीर्षकाच्या मागे अथवा पुढे शहर, राज्य, नियतकालिक, भाषा, अव्यये/विशेषणे, उपसर्ग (A, An, The) इ. जोडून तयार केलेल्या शीर्षकांचे सत्यापन केले जाणार नाही. उदा.: द, टाईम्स, डेली, दैनिक, वीकली(साप्ताहिक),व्ही/वार्ता, आज, टूडे, एक्सप्रेस, न्यूज, खबर, समाचार, बुलेटिन, डायरी, इंडिया, नॅशनल, राष्ट्रीय इ.

xix. **विद्यमान शीर्षकाच्या**मागे अथवा पुढे नियतकालिक अथवा प्रस्तावित प्रकाशनाची भाषा जोडून तयार केलेल्या शीर्षकांचे सत्यापन केले जाणार नाही.

xx. केवळ स्पर्धा परीक्षा किंवा अभ्यासाचे साहित्य / कोचिंग साहित्याशी संबंधित मजकूर असलेल्या प्रकाशनांची शीर्षके सत्यापित केली जाणार नाहीत.

xxi. विद्यमान शीर्षकाशी साधर्म्य असणारी, मात्र स्पेलींग वेगळे असणारी शीर्षके सत्यापित केली जाणार नाहीत.

(16) **अर्जदारांच्या मार्गदर्शनासाठी संकीर्ण सूचना / तरतूदी**:

a. **शीर्षक सत्यापनाच्या तारखेपासून एका वर्षाच्या अवधीत**मालक / प्रकाशकाला रजिस्ट्रार ऑफ न्यूजपेपर्स (RNI) यांच्या कार्यालयाकडे शीर्षकाची नोंदणी करावी लागेल. सत्यापित केलेल्या शीर्षकाची नोंदणी एका वर्षभरात न केल्यास ते आरक्षित राहणार नाही आणि इतर अर्जदारांसाठी उपलब्ध होईल.

b. शीर्षक सत्यापनासाठीच्या एखाद्या अर्जाच्या प्रक्रियेदरम्यान**तफावत पत्र** (Discrepancy Letter - **D/L)**जारी झाल्यास असे पत्र जारी झाल्यापासून 60 दिवसांच्या अवधीत अर्जदाराला उत्तर द्यावे लागेल. निर्धारित अवधीत उत्तर न पाठविल्यास अर्ज फेटाळला जाईल. अशा प्रकरणी, संबंधित जिल्हा न्यायदंडाधिकाऱ्याने प्रमाणित केलेला नवा शीर्षक सत्यापन अर्ज सादर करावा लागेल.

**c.** तफावत पत्रे (Discrepancy Letter**)** RNI च्या संकेतस्थळावर उपलब्ध आहेत.**त्यामुळे तफावत पत्रे प्राप्त न होणे, हे अशा प्रकारच्या तफावत पत्राला उत्तर न देण्यातील विलंबाचे कारण मानले जाणार नाही.**

d. यापूर्वी अर्जदाराच्या मालकीच्या असणाऱ्या आणि नंतर खुल्या झालेल्या शीर्षकावर अर्जदाराचा कोणताही दावा राहणार नाही. कोणत्याही अर्जदारासाठी अशा प्रकारच्या खुल्या शीर्षकाची पडताळणी, विद्यमान मार्गदर्शक तत्वे आणि नियमांच्या अधिन राहून केली जाईल.

e. एकदा अर्ज फेटाळला गेल्यानंतर अर्जदाराला अग्रेषण प्राधिकाऱ्यांमार्फत नव्याने अर्ज सादर करावा लागेल. अग्रेषण प्राधिकाऱ्यांमार्फत योग्य अधिप्रमाणनाशिवाय अर्जदाराने थेट सादर केलेल्या शीर्षक पर्यायांची दखल RNI घेणार नाही.

f. सत्यापित शीर्षकाची नोंदणी केली नसल्यास, कारणाची लेखी नोंद केल्यानंतर प्रेस रजिस्ट्रारला ते रद्द करण्याचे अधिकार राहतील.

g. प्रक्रियेतील कोणत्याही प्रकारचा विलंब किंवा नामंजुरी टाळण्यासाठी अर्जदाराने शीर्षक सत्यापनासाठी अर्ज करताना मार्गदर्शक सूचनांचे काटेकोर पालन करावे.

h. याबाबत किंवा तत्सम बाबींचा अर्थ लावण्याबाबत कोणत्याही प्रकारची शंका असल्यास, त्याबाबत प्रेस रजिस्ट्रार यांचा निर्णय अंतिम राहील.

(i) नियतकालिकांसाठी प्रकाशन शीर्षकांचे सत्यापन एखाद्या व्यक्तीच्या नावे केले जाणार नाही. केवळ संघटना/संस्था/सोसायट्या इ. च्या नावे असलेल्या

नियतकालिकांचेच सत्यापन केले जाईल. अशा प्रकरणी समान विषयांवरील विविध नियतकालिकांमधील फरक स्पष्ट करण्यासाठी अशा संस्था / संघटना / कंपन्यांचे नाव शीर्षकाआधी उद्धृत करावे.

(j) जर प्रकाशनाचा मजकूर बातम्या अथवा सार्वजनिक बातम्यांवरील टिप्पण्या या प्रवर्गातील नसेल किंवा प्रकाशनाचा मजकूर, शीर्षकासाठी अर्ज करताना नमूद केलेल्या स्वरूप आणि मजकुराशी जुळणारा नसेल तर सत्यापन झालेले शीर्षक नोंदणीपूर्वी रद्द होऊ शकते.

(k) जर एखादे वर्तमानपत्र / प्रकाशन एखाद्या शासकीय विभाग / संघटनेतर्फे आणण्याचे प्रस्तावित असेल तर संबंधित विभाग प्रमुख, अशा शीर्षकाच्या सत्यापनासाठी अर्ज केला जाईल आणि त्यांच्या नावेच शीर्षकाचे सत्यापन केले जाईल.

(17). **खुलासा**:प्रस्तावित वर्तमानपत्र/ नियतकालिकाच्या शीर्षकाचे सत्यापन हे पीआरबी अधिनियम 1867 अंतर्गत रजिस्ट्रार ऑफ न्यूजपेपर यांच्याकडे, सदर वर्तमानपत्राच्या नोंदणीपुरतेच मर्यादित राहील. शीर्षकाला मान्यतेचा अर्थ ट्रेडमार्क / ब्रँड नेम, कंपनीचे नाव इ. ला मान्यता असा होत नाही आणि अशा हेतूंसाठी अर्जदाराला ट्रेड मार्क अधिनियम, कंपनी ॲक्ट अधिनियम इ. संबंधित अधिनियमांच्या तरतुदींअंतर्गत संबंधित अधिकाऱ्यांकडून आवश्यक मंजुरी घ्यावी लागेल.**यासंदर्भात कोणताही वाद उद्भवल्यास तो संबंधित दोन पक्षांमधील वादाचा विषय असेल आणि रजिस्ट्रार ऑफ न्यूजपेपर्स ऑफ इंडिया हे कोणत्याही प्रकारे त्यात पक्षकार असणार नाहीत.**

******